**myresearchgo Volume 2, Issue 5, May 2026, ISSN: 3107-3816 (Online)**

# रासक्रीडा

सौ. विनिता वेल्हाणकर

रेडमंड, वॉशिंग्टन, यू. एस. ए.

रासक्रीडा हा श्रीमद् भागवतातील अत्यंत महत्त्वाचा व तात्त्विक दृष्ट्या गहन असा प्रसंग असून तो श्रीकृष्ण आणि गोपिकांमधील उत्कट भक्तीचे सर्वोच्च रूप दर्शवतो. सामान्यतः रासक्रीडेचा संबंध कामभावनेशी जोडला जात असला, तरी श्रीधराचार्यांच्या मते रासक्रीडा म्हणजे *कामावर विजय मिळवण्याचे आख्यान* आहे. श्रीकृष्णाने गोपिकांच्या अंतःकरणातील कामभावनेचे रूपांतर प्रेम व भक्तीत करून कामदेवावर विजय मिळवला, हे या कथानकाचे मुख्य तत्त्व आहे.

एकोनाथ महाराज सांगतात की गोपिका या पूर्वजन्मीच्या वेदांतील श्रुती होत्या. निर्गुण, निराकार भगवंताचे वर्णन न करता आल्यामुळे, सगुण रूपातील आनंद अनुभवण्यासाठी त्या गोपिकांच्या रूपात अवतरल्या. कर्मपर, ज्ञानपर आणि भक्तिपर श्रुतींच्या रूपकातून भक्तीचे श्रेष्ठत्व अधोरेखित केले आहे, कारण भक्ती ही कर्म वा ज्ञानावर अवलंबून नसून पूर्णतः स्वतंत्र आहे.

श्रीकृष्णाने गोपिकांच्या घरातील दूध-दही-लोणी चोरी करणे, दुधाणी पालथी घालणे आणि बासरी वाजवून त्यांना बोलावणे, यांद्वारे प्रारब्ध, अहंकार आणि भेदभावाचा नाश केला. रासक्रीडेमध्ये नऊही रस—शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, अद्भुत, भयानक, बीभत्स व शांत—एकत्र प्रकट होतात; परंतु या सर्वांच्या केंद्रस्थानी भक्तिरस आहे.

अहंकार उत्पन्न होताच श्रीकृष्ण अंतर्धान पावतात आणि विरहातून गोपीगीत प्रकट होते. अहंकार नष्ट झाल्यावर भगवंत पुन्हा प्रकट होतात. रासक्रीडेचे प्रयोजन परार्थी (गोपिकांचे कल्याण) आणि स्वार्थी (भगवंताचा आत्मानंद) असे दोन्ही असून, ही लीला भक्ती, प्रेम, वैराग्य व अद्वैत तत्त्वज्ञानाचे सुंदर दर्शन घडवते.

**सूचक शब्द:** स्वार्थी प्रयोजन, परार्थी प्रयोजन, कामविजय अख्यान, उत्कट भक्ति

श्रीमद् भागवतामधील रासक्रीडा हा भागवतातील महत्त्वाचा भाग आहे. तो भागवताचा प्राण आहे. त्यामध्ये गोपिकांच्या अंत करणात श्रीकृष्णाबद्दल असलेली उत्कट भक्ति आहे. त्यांच्या मनात श्रीकृष्णाबद्दल असलेले प्रेम आहे. श्रीकृष्णाच्या बाजूने विचार केला तर रासक्रीडेतून श्रीकृष्णाने कामावर विजय मिळवलेला आहे. रासक्रीडेतून त्याने गोपिकांच्या अहंकाराचा पूर्ण निरास केला आहे. सामान्यतः रासक्रीडेचा संबंध कामभावनेशी जोडला जात असला, तरी श्रीधराचार्यांच्या मते रासक्रीडेचा गाभा कामभावनेच्या गौरवात नसून तिच्या तात्त्विक रूपांतरणात आहे. येथे श्रीकृष्ण गोपिकांच्या अंतःकरणातील कामाची जागा प्रेम आणि भक्तीने भरून काढतात. अशा प्रकारे कामदेवाचा केवळ पराभव होत नाही, तर कामभावनेचे परम भक्तीत रूपांतर घडून येते. रासक्रीडा म्हणजे काम विजय आख्यान आहे असे श्रीधर आचार्यांचे मत आहे यामुळेच रासक्रीडा हे *कामविजयाचे आख्यान* ठरते. कामदेवाला अतिशय अहंकार झाला होता. त्याला असं वाटत होते की सर्व देवांपेक्षा मी श्रेष्ठ आहे म्हणून त्याने श्रीकृष्णाला एकदा युद्धाचे आव्हान दिले आणि सांगितले की मी अपराजित आहे. मी फक्त अजून तुझ्यावर विजय मिळवलेला नाही. तु माझ्याशी युद्ध कर. मी तुझ्यावर विजय मिळवेन. श्रीकृष्णाने त्याचे आव्हान स्वीकारले. श्रीकृष्णाने कामाला सांगितले तुला हवी तशी युद्धनीती तू ठरव मग कामाने ठरवले की आपण किल्ल्यातून लढाई करायची. त्याने श्रीकृष्णाला, मोकळ्या मैदानातून लढायला सांगितले. त्याप्रमाणे श्री कृष्ण वृंदावनाच्या वाळवंटातून लढला. आणि कामाने गोपिकांच्या हृदयात आश्रय घेतला. सगळी परिस्थिती कामाला अनुकूल अशी होती. मलय पर्वतावरून सुगंधित वारा वाहत होता. वेली फुलांनी बहरल्या होत्या. वृक्ष फळांनी लगडले होते. शरद पौर्णिमेचे टिपूर चांदणे पसरले होते. आणि कामासक्त झालेल्या गोपिका होत्या. अशा गोपिका बरोबर श्रीकृष्णाने रासक्रीडा केली. रासक्रीडा करताना गोपिकांच्या आंतरकर्णातील कामाची जागा प्रेमाने आणि भक्तीने घेतली अशा प्रकारे श्रीकृष्णाने कामावर विजय मिळवला. श्रीकृष्णाने कामाचे रूपांतर प्रेमात कसे केले?

एकनाथ महाराज सांगतात गोपिका या पूर्वजन्मीच्या वेदामधील श्रुती आहेत. नाथ भागवतात श्रीकृष्ण उद्धवाला सांगतो, तू जाण या वेध गरबीचा श्रुती रे`भगवंत कसा आहे हे सांगणें वेदांना जमले नाही. वेदांतमधील श्रुती जेव्हा भगवंत कसा आहे याचे वर्णन करायला गेल्या तेव्हा त्यांना भगवंत हा अव्यक्त निराकार निर्गुण अनंत आहे असे नकारार्थी वर्णन करावे लागले. भगवंत कसा आहे हे सांगताना 'नेती नेती' म्हणत श्रुती मागे फिरल्या तेव्हा श्रुतिनी भगवंताला विचारले, जर आम्ही अशा मागे फिरलो तर

आम्हाला तुझा सहवास कसा मिळेल? तेव्हां भगवंताने उत्तर दिले " मी पुढे श्रीकृष्ण अवतार घेईन त्यावेळी तुम्ही माझ्याबरोबर गोपिका म्हणून अवतार घ्याल आणि त्यावेळेस तुम्हाला माझ्या सगुण रूपातील आनंद मिळेल". वेदांमधील श्रुतीने श्रीकृष्णाबरोबर गोपिका म्हणून अवतार घेतला. भक्तिशास्त्र सांगते भगवंत जेव्हा अवतार घेतात तेव्हा त्यांच्या कार्याला अनुरूप असेल अशा परिस्थितीतसह ते अवतार घेतात. तसेच त्यांच्या कार्यासाठी लागणार्या सर्व गोष्टींसह ते अवतार घेतात. श्री कृष्णाला गोवर्धन पर्वताचे उद्धरण करायचे होते त्याने गोवर्धनसह अवतार घेतला. त्याला यमुना नदीवर कार्य करायचे होते, यमुना नदीवर खेळायचे होते, म्हणून यमुना नदीने सुद्धा श्रीकृष्णा बरोबर अवतार घेतला. गोपाळ गायी हे सुद्धा अवतार होते बलराम शेषनागाचा अवतार होता, तशाच गोपिका सुद्धा वेदांमधील श्रुती होत्या. वेदांमध्ये तीन प्रकारच्या श्रुती आहेत, एक कर्मपर श्रुती, दोन ज्ञानपर श्रुती आणि तीन भक्तिपर श्रुती. कर्मपर श्रुती या गोपिकांमधील सुना झाल्या, ज्ञानपर श्रुती या गोपिका मधील लेकी झाल्या तर भक्तिपर श्रुती या गोपिकामधील सासू झाल्या. कर्म हे नेहमी परतंत्र असते. सूनही कायम परतंत्र असते, म्हणून सुना या कर्मपर श्रुती होत्या. लेक माहेरी असते तेव्हा स्वतंत्र असते आणि लग्न होऊन सासरी गेली की परतंत्र होते. ज्ञान हे तसच असते, ज्ञान हे प्रथम स्वतंत्र असते परंतु ते प्राप्त होण्यासाठी गुरूवर अवलंबून असते म्हणून ज्ञानपर श्रुती या लेकी झाल्या. भक्तिही कायम स्वतंत्र असते. भक्ति ज्ञानावर अथवा कर्मावर अवलंबून नसते, म्हणून भक्तिपर श्रुती सासू झाल्या. सासू कधीही परतंत्र नसते, ती नेहमी स्वतंत्र असते. माणसाला लौकिकार्थाने ज्ञान नसले तरी भक्ति केली तर त्याला ब्रह्मज्ञान प्राप्त होऊ शकते. उदाहरणार्थ वाल्याचा वाल्मीकी झाला तसेच कर्मावर भक्ति अवलंबून नसते. अजामेळ हा पापी होता, त्याने आयुष्यभर दुष्कर्मे केली, परंतु अंतकाळीं त्याने देवाचे नाव घेतले आणि त्याला मुक्ती मिळाली. अशा कर्मपर ज्ञानपर आणि भक्तीपर श्रुती गोपिका म्हणून जन्मल्या.

भगवंताने प्रथम काय केले तर त्यांच्या घरी चोरी केली त्यांच्या घरातले दूध दही लोणी चोरलेआणि दूधआणि पालथ्या घातल्या. दुधाणे म्हणजे ज्यात दूध दही लोणी साठवून ठेवलेले असते त्याला दुधाणी म्हणतात. श्रीकृष्णाने दूधदुभते चोरले आणि दुधाणी पालथी घातली. संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतात `पाहती गवळणी! तव ती पालथी दुधाणी!!! नंदाची आली पोरें! केली चोरी खरे!!. श्रीकृष्णाने दुधाणी पालथी घातली मणजे गोपिकांनी जे साठवले होते ते सर्व काढून घेतले होते. कर्माच्या मागे प्रारब्ध साठवले जाते. ज्ञानाच्या मागे अहंकार साठवला जातो, तर भक्तीच्या मागे भेद साठवला जातो. कर्म केले की त्याचे फळ मिळते, हे कर्मफल भोगून संपवले नाही तर त्याचे प्रारब्ध होते. ज्ञानी माणसाला अहंकार होतो आणि भक्ति करणार्या भक्ता च्या मनात देव आणि भक्त असा भेद निर्माण होतो. भगवंताला प्रारब्ध अहंकार भेद चालत नाही. श्रीकृष्णाने या सर्वांचा प्रथम निरास केला. नंतर बासरी वाजवून गोपिकाना बोलवून घेतले आणि रासक्रीडा केली. श्रीकृष्णाने बासरीतून क्लीन असा स्वर काढला. क्लीन हे कामाचे स्वरबीज आहे. हा ध्वनी कानी पडल्यावर गोपिका आहेत तशाच बाहेर पडल्या आणि वृंदावनामध्ये आल्या. तेथें श्रीकृष्णाने गो पिकांबरोबर रासक्रीडा केली म्हणजे कृष्णाने गोपिकांबरोबर नृत्य केले. श्री कृष्ण बरोबर मध्येउभा होता आणि गोपिकानी त्याच्याभोवती फेर धरला.

रास या शब्दाचा असाही एक अर्थ आहे की रास म्हणजे रसांचा समूह. तात्विक अर्थात पारमार्थिक चिंतन केले तर रस मणजे जे असल्या वर आपल्याला आनंद प्राप्त होतो तो रस, तसेज एखाद्या पदार्थात जे नसेल तर तो पदार्थ टाकून द्यावा लागतो त्याला रस म्हणतात. आंब्यातील रसामुळे आपल्याला आनंद मिळतो, तसेच आंब्यातील रस काढून टाकला तर उरलेली कोय आणि साल टाकून घ्यावी लागते, म्हणून पदार्थातील रस हा महत्त्वाचा असतो. पदार्थ अनेक असतात, पण त्यातील रस हां एकच असतो. आंबे अनेक असतात पण त्यातील रस हा एक असतो. आध्यात्मिक विचार केला तर शरीर वेगवेगळी असतात पण त्यातील चैतन्य एकच असते. त्या चैतन्याला आत्मतत्व मानतात. साहित्य शास्त्र सांगते रास म्हणजे रसांचा समूह. एकूण नऊ रस आहेत ते असे. श्रृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, अद्भूत, भयानक, बीभत्स, शांत.

रासक्रीडेमध्ये शृंगाररस हा प्रधान रस आहे. बासरीचा स्वर कानावर पडला आणि गोपिका हातातील कामे तशीच टाकून निघाल्या. काही गोपिका पायात चपला घालताना एक चप्पल आपली आणि दुसरी चप्पल नवऱ्याची घालून बाहेर पडल्या. काही गोपिका पती साठी श्रृंगार करत होत्या, वरच्या ओठाला लाली लावली आणि बासरीचा स्वर कानी पडल्यावर खालच्या ओठाला लाली लावण्याच्या विसरल्या आणि तशाच बाहेर पडल्या. यामुळे हास्य निर्माण झाले, हा झाला हास्यरस. गोपिका बाहेर पडल्या, पण त्यांना वाटले समजा श्रीकृष्ण भेटलाच नाही तर, त्याचा विरह झाला तर, विरह करुणा निर्माण करतो. गोपिका लहान मुलांना टाकून बाहेर पडल्या, हां झाला करुण रस. काही गोपिका नवऱ्याला जेवण वाढीत होत्या, त्या अर्धवट जेवण वाढून बाहेर पडल्या. त्यांना हात धरून थांबवायचा प्रयत्न केला, तर त्या हाताला हिसडा देऊन बाहेर पडल्या. हां झाला रौद्ररस. गोपिका वेगाने बाहेर पडल्या . रासक्रीडेमध्ये असे वर्णन आहे त्यांच्या कानातील कुंडलें वेगाने हलत होती. हां झाला विररस. उत्साहातून वीर रस निर्माण होतो. गोपिका बाहेर पडल्या पण प्रत्येक गोपिका दुसऱ्या गोपी केला चुकवून बाहेर पडली कारण प्रत्येकीला असे वाटत होते की फक्त आपणच श्रीकृष्णा बरोबर असावे अशी प्रत्येक गोपिका दुसरीला चुकवून बाहेर पडली, तरी तिथे गेल्या नंतर त्यांना लक्षात आले की सर्व गोपिका तिकडे आहेत. हां झाला अद् भुत रस. श्रीकृष्णाने बासरी वाजवली.

बासरीचा परिणाम गोपाळ वर झाला नाही हासुद्धा अद् भुत रस आहे. गोपिका श्री कृष्णाजवळ पोहोचल्या आणि श्रीकृष्णाने त्यांना प्रथम परत जायला सांगितले, तो म्हणाला हे भयानक जंगल आहे, श्वापदें इथे आहेत, तुम्ही परत जा. हां आहे भीती निर्माण करणारा भयानक रस. श्रीकृष्णाने गोपिकाना जिवाची भीती दाखवली. पुढे त्यांना समजावले, घरची माणसे तुम्हाला शोधत असतील. तुम्ही परत जा. सासू सासऱ्यांची सेवा, मुलांचं संगोपन आणि पतिव्रता हा तुमचा धर्म आहे. तो तुम्ही पाडा. परंतु गोपिका परत गेल्या नाहीत. त्या वेळेस गोपिकाना संसार हा खोटा वाटत होता. संसार बीभत्स वाटू लागला. त्यांच्यामध्ये वैराग्य निर्माण झाले, हां झाला बीभत्स रस. नंतर गोपिका श्रीकृष्णाच्या समोर उभ्या राहिल्या. श्री कृष्णाकडे बघून त्यांना शांत वाटले, हा झाला शांतरस. हे सर्व रस एकाच वेळेस एकत्र आले, म्हणून याला रास असे म्हणतात. या सर्व रसांच्या अग्रभागी भक्तिरस होता. या सर्व रसांनी भक्तिरसाची पूजा केली. साहित्यशास्त्रात भक्तिरस ओळखला जात नाही परंतु संताना भक्ति रसात आनंद वाटतो, म्हणून भक्तिरस हां एक रस आहे असे संतांचे मत आहे. गोपिका श्रीकृष्णाजवळ आल्यानंतर श्रीकृष्णाने त्याना परत जायला सांगितले परंतु त्या परत गेल्या नाहीत. श्रीकृष्णाला पटले की गोपिकांची आपल्या वर निस्सिम भक्ति आहे. अशी खात्री झाल्यानंतर श्रीकृष्णाने त्यांच्याबरोबर रासक्रीडा केली, ही क्रीडा करत असताना प्रत्येक गोपीकेला वाटू लागले की जगात मी सर्वात भाग्यवान आहे. श्री कृष्ण माझ्या बरोबर आहे. तो माझ्या बरोबर क्रीडा करत आहे. असा अहंकार गोपिकांच्या मनात निर्माण झाल्या बरोबर भगवंत अंतर्धान पावला. जिथे अहंकार असतो, तिथे भगवंत राहत नाही. भगवंत अंतर्धान पावल्या बरोबर गोपिका सैरभैर झाल्या. त्यांनी विरहिणी म्हणायला सुरूवात केली. भगवंताचा विरह त्यांना सहन झाला नाही. त्याना प्रत्येक ठिकाणी भगवंत दिसू लागला. त्यांनी श्री कृष्णाची आळवणी सुरू केली. याला गोपी गीत म्हणतात. गोपी गीत म्हणजे गोपिकांचा श्रीकृष्णावरील प्रेमाचा उत्कट बिंदू होता. श्री कृष्ण अंतर्धान पावल्या बरोबर गोपिकांचा अहंकार नाहीसा झाला. त्याची जागा भक्ति आणि प्रेमाने घेतली. या गीतानंमुळे या भक्तीमुळे श्री कृष्ण प्रगट झाला आणि त्याने परत गोपिका बरोबर रासक्रीडा केली. आता गोपिकाना सर्वत्र श्री कृष्ण दिसत होता. आधीच्या रासक्रीडेमध्ये एक भगवंत आणि अनेक गोपिका होत्या, आता एक भगवंत आणि एक गोपिका असे सर्वत्र दिसत होते. या रासक्रीडे मागील भगवंताचें प्रयोजन आपण थोडे सविस्तर बघूया.

प्रयोजन नेहमी दोन प्रकारचे असते, एक स्वार्थी प्रयोजन आणि दुसरे परार्थी प्रयोजन. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली कारण त्यांचे गुरु निवृत्तीनाथ यानी त्याना तशी आज्ञा केली होती. गुरूंची आज्ञा पाळणे हे ज्ञानेश्वर स्वतःचे कर्तव्य मानत होते. गुरुआज्ञा पालन करण्यासाठी म्हणून ज्ञानेश्वरी लिहिणे हेझाले स्वार्थी प्रयोजन. सर्व जगाचे कल्याण व्हावे असे संत ज्ञानेश्वर यांना वाटत होते. हे झाले परार्थी प्रयोजन. श्रीकृष्णाने रासक्रीडा केली त्यामागे गोपिकाना आनंद द्यावा, त्यांच्यातील अहंकार दूर करावा आणि कामाचा पराभव करावा, असे प्रयोजन होते हे परार्थी प्रयोजन आहे. श्रीकृष्णाचे रासक्रीडे मागे सुद्धा स्वार्थी प्रयोजन होते. श्री कृष्ण म्हणजे भगवंत हा स्वतः आनन्दमय असतो. भगवंताला आनंद उपभोगायची इच्छा झाली, त्याला आत्मसुख अनुभवायचे होते. या आत्म सुखासाठी श्रीकृष्णाने रासक्रीडा केली. त्याला कांता प्रेम अनुभवायचे होते. हे कांता प्रेम देव आणि भक्त या दोघांमधील होते. वैराग्यसंपन्न भगवंताने रासक्रीडा करावी याचे आश्चर्य श्रीमद् भागवतात व्यक् त केले आहे. रासक्रीडा करावी ही भगवंताची इच्छा होती. त्याने बासरी वाजवून गोपिकाना बोलवून घेतले. रासक्रीडेमध्ये गोपिकाना जास्त महत्व दिले आहे. अशा प्रकारे रासक्रीडा ही केवळ एक अलौकिक लीला न राहता भक्तीमार्गाच्या परिपूर्णतेचे दर्शन घडवणारी तात्त्विक अनुभूती ठरते. येथे कामभावनेचे रूपांतर प्रेमात होते, अहंकार विरहातून निवळतो आणि भक्त-भगवंत भेद अद्वैतात विलीन होतो. गोपिकांचे श्रीकृष्णावरील निःस्वार्थ, अनन्य आणि निस्सीम प्रेम हे भक्तीचे सर्वोच्च स्वरूप प्रकट करते. म्हणूनच श्रीमद् भागवतातील रासक्रीडा ही भक्ती, वैराग्य आणि आत्मतत्त्व यांचा समन्वय साधणारी, मानवाला परम आनंदाच्या दिशेने नेणारी दिव्य लीला आहे. हि रासक्रीडा श्रीमद् भागवतमध्ये स्कंध 10 अध्या 29 ते 33 मध्ये वर्णन केली आहे.

सौ. विनिता वेल्हाणकर

रेडमंड, वॉशिंग्टन, यू. एस. ए.